# वाघ अभियांत्रिकीचे ब्रह्मास्त्र क्वाड प्रथम

नाशिक, ता. ८ : भोपाळ येथे नुकतीच राष्ट्रीय स्तरावरील 'आयएसएनई मोटरस्पोर्ट्स' या सीझन- १० क्वाड टॉर्क स्पर्धा नुकतीच झाली. स्पर्धेत के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ब्रह्मास्त्र क्वाडच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. महाविद्यालयाच्या मेकॅनिकल, रोबोटिक्स, ए.आय.डी.एस आणि इलेक्ट्रिकल विभागाच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

स्पर्धेतील अनेक मापदंड के. के. वाघ अभियांत्रिकी ब्रह्मास्त्र क्वाडने यशस्वीपणे पूर्ण केले. त्यात प्रामुख्याने किल द हिल, सस्पेन्शन, एक्सीलेरेशन, एन्ड्युरन्स व फ्युएल इकोनॉमी, मन्युव्हेरेबिलिटी, डिझाईन, कॉस्ट रिपोर्ट, बिझनेस प्लॅन, सी. ए. इ. व बेस्ट इनोव्हेशन अवॉर्ड, डिस असेम्ब्ली आणि असेम्ब्ली, मध्ये बक्षिस पटकावले. सर्वोत्कृष्ट रायडर हा अवॉर्ड भार्गव पाटीलने जिंकला. स्पर्धेतील १६ पैकी १३ पारितोषिकांवर के के वाघच्या ब्रह्मास्त्र क्वाडने बाजी मारली. टिम ब्रह्मास्त्र क्वाडने वाहन (ATV QUAD BIKE) तयार करताना त्याचे इंजिन, गिअर बॉक्स, सस्पेन्शन, चासिस, ब्रेक्स, अस्थेटिक, स्टिअरिंग मेकॅनिझमसाठी आवश्यक असलेल्या यंत्रसामग्रीचा उपयोग महाविद्यालयाच्या वर्कशॉपमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केले. गेल्या आठ वर्षांपासून अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी या व अशा विविध स्पर्धांमध्ये भाग घेतात. या स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यासाठी वाहने, अवजारे बनविण्यासाठी संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, डॉ. पी. वी. कुशारे, डॉ. पी. जे. पवार, डॉ. आर. के. मुंजे, डॉ. एस. बी. गुळवे, राहुल कार्लेकर, सुरेश कुंभार्डे यांचे सहकार्य लाभले.

Sakal 09-11-2024